सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

# सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३

# मुंबई होमगार्ड अधिनियम, १९४७

(१३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

# Bombay Act No. III of 1947

# Bombay Home Guards Act, 1947

*(As modified upto 13th November 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

2006

[किंमत : रु. ४.००]

# मुंबई होमगार्ड अधिनियम, १९४७

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| उद्देशिका. | | पृष्ठे |
| कलमे | | |
| १. | संक्षिप्त नाव,व्याप्ती व प्रारंभ. | २ |
| २. | होमगार्डची रचना आणि महा समादेशक व समादेशक यांची नेमणूक. | २ |
| २-क | समादेशक व महा समादेशक यांचा पदावधी आणि सेवेच्या शर्ती. | ३ |
| ३. | सदस्यांची नेमणूक. | ३ |
| ४. | सदस्यांची कामे व कर्तव्ये. | ३ |
| ५. | अधिकार, संरक्षण व नियंत्रण. | ३ |
| ६. | पोलीस दलातील अधिकाऱ्यांनी नियंत्रण ठेवणे. | ४ |
| ६-क | सदस्य असण्याचे बंद झाल्यावर प्रमाणपत्र, शस्त्रे वगैरे स्वाधीन करणे. | ४ |
| ६-ख | कर्तव्य, वगैरे बजावण्यात हयगय केल्याबद्दल सदस्यास शिक्षा | ४ |
| ७. | शास्ती. | ६ |
| ८. | नियम. | ६ |
| ९. | होमगार्ड लोकसेवक असणे. | ७ |
| ९-अ. | होमगार्ड राज्य विधान मंडळाच्या किंवा स्थानिक संस्थांच्या निवडणुका लढविण्यास निरर्ह नसणे. | ७ |
| १०. | निरसन व व्यावृत्ती. | ७ |

# सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३[१].

[ मुंबई होमगार्ड अधिनियम, १९४७. ]†

राज्यपाल यांची दिनांक १९ मार्च १९४७ रोजी अनुमती मिळाल्यानंतर **मुंबई शासन राजपत्रात** दिनांक २२ मार्च १९४७ रोजी प्रथम इंग्रजीत प्रसिद्ध करण्यात आलेला.

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, फेरबदल व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ११.

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७५.*

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

महाराष्ट्र विधि अनुकुलन (राज्य व समवर्ती) विषय आदेश, १९६०.

## होमगार्डची रचना करण्यासाठी तरतूद करण्याबाबत अधिनियम

**ज्याअर्थी,** [२][महाराष्ट्र राज्यात] आकस्मिक निकडीच्या वेळी उपयोग करण्याकरिता व इतर प्रयोजनांसाठी स्वयंसेवक संघटनेची तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

---

[१]उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी **मुंबई शासन राजपत्र,** १९४७, भाग पाच, पृष्ठ २५ पहा, विधानसभेतील कामकाजासाठी मुंबई विधानसभा चर्चा, १९४७, खंड दहा आणि परिषदेतील कामकाजासाठी मुंबई विधान परिषद चर्चा, १९४७, खंड बारा पहा.

† सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७५ च्या प्रारंभाच्या लगतपूर्वी हा अधिनियम मुंबई राज्याच्या ज्या भागाला लागू नव्हता तेथे तो लागू करणात आला. (सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७५ चे कलम २ पहा.)

* सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७५ याचे कलम ८ पुढीलप्रमाणे आहे :—

१९४७ चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम १५

" ८. मध्यप्रांत व वऱ्हाड होमगार्ड अधिनियम, १९४७ आणि सौराष्ट्र राज्य होमगार्ड अध्यादेश, १९४८ हे याद्वारे निरसित करण्यात येत आहेत ;

परंतु अशा निरसनामुळे—

(अ) अशा रीतीने निरसित केलेल्या कायद्यांच्या पूर्वीच्या अंमलास, किंवा

(ब) अशा रीतीने निरसित केलेल्या कायद्यांच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या बाबतीत झालेली कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा यांस, किंवा

१९४८ चा सौराष्ट्र आदेश १७

(क) अशा पूर्वोक्त शास्तीच्या, समपहरणाच्या किंवा शिक्षेच्या बाबतीत करावयाचे कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कारवाई किंवा उपाययोजना यांस,

बाध येणार नाही आणि हा अधिनियम पारित झाला नव्हता असे समजून असे कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कारवाई किंवा उपाययोजना करता, चालू ठेवता किंवा अंमलात आणता येईल, आणि अशी कोणतीही शास्ती, समपहरण किंवा शिक्षा लादता येईल. "

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई राज्यात " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, मुंबई होमगार्ड अधिनियम, १९४७, असे म्हणावे.

[१][ (२) तो, संपूर्ण [२](महाराष्ट्र राज्यास) लागू आहे. ]

(३) तो बृहन्मुंबईच्या क्षेत्रात आणि अहमदाबाद बरो नगरपालिका व अहमदाबाद कटक यांच्या हद्दीत समाविष्ट असलेल्या क्षेत्रात ताबडतोब अंमलात येईल. [३][ मुंबई होमगार्ड (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९५८ च्या प्रारंभाच्या तारखेपासून तो, *मुंबई राज्याच्या संपूर्ण सौराष्ट्र प्रदेशात आणि विदर्भ विभागाच्या ज्या प्रदेशात, अशा दिनांकाच्या लगतपूर्वी, मध्यप्रांत व वऱ्हाड होमगार्ड अधिनियम, १९४७ अंमलात होता त्या प्रदेशात अंमलात येईल. ] [४][राज्य] शासनास **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे असा निदेश देता येईल की, तो अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या दिनांकास [५][महाराष्ट्र राज्यातील] कोणत्याही इतर क्षेत्रात अंमलात येईल.

१९५८ चा मुंबई ७५. १९४७ चा मध्यप्रांत व वऱ्हाड १५.

होमगार्डची रचना आणि [७][महा समादेशक व समादेशक यांची नेमणूक.]

२. (१) [४][ राज्य ] शासनाने कलम १, पोट-कलम (३) यात विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांसाठी तसेच उक्त पोट-कलम (३) अन्वये जाहीर केलेल्या प्रत्येक क्षेत्रांसाठी, होमगार्ड नावाच्या एका स्वयंसेवक संस्थेची रचना केली पाहिजे. लोकांचे संरक्षण, मालमत्तेचे रक्षण व सार्वजनिक सुरक्षितता, यासंबंधी या अधिनियमाच्या व तदन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार अशा संस्थेतील सदस्यांनी त्यांना नेमून दिलेली कामे [६][व कर्तव्ये ] बजावली पाहिजेत.

[८][ (१-अ) सौराष्ट्र प्रदेशाच्या व विदर्भ विभागाच्या संबंधात, मुंबई होमगार्ड (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९५८ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी उभारलेली किंवा रचना केलेली होमगार्ड संघटना ही, पोट-कलम (१) अन्वये रचना केलेली संघटना आहे असे समजण्यात येईल.] १९५८ चा मुंबई ७५.

(२) पोट-कलम (१) अन्वये रचना करण्यात आलेल्या प्रत्येक होमगार्डसाठी [४][राज्य] शासनाने एक समादेशक नेमला पाहिजे.

[९][ (३) तसेच राज्य शासनाने होमगार्डसाठी एक महा समादेशक नेमला पाहिजे व त्याच्याकडे संपूर्ण [२][ महाराष्ट्र राज्यातील ] होमगार्डवर सर्वसाधारण देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे काम असेल.]

---

[१] मूळ पोट कलमाऐवजी हे पोट-कलम सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७५ च्या कलम ४ (१) अन्वये दाखल करण्यात आले.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये ' मुंबई राज्यास ', या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७५ च्या कलम ४ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[६] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम २ (१) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[७] वरील अधिनियमाचे कलम २ (३) अन्वये ' समादेशक ' या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७५, याच्या कलम ५ (१) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[९] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम २ (२) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

* महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई राज्याच्या " हे शब्द बदलले नाहीत.

समादेशक व महा समादेशक यांचा पदावधी आणि सेवेच्या शर्ती.

[१][ २-क. (१) समादेशक व महा-समादेशक यांचा पदावधी व सेवेच्या इतर शर्ती या, राज्य शासन, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित करील त्याप्रमाणे असतील.

परंतु, कोणत्याही समादेशकाची किंवा महा समादेशकाची नेमणूक करताना, राज्य शासनास, राज्य शासन त्याच्या बाबतीत निश्चित करील अशा कालावधीसाठी, तो पद धारण करील असा निदेश देता येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, कोणत्याही समादेशकास किंवा महा समादेशकास, त्याच्या सेवासमाप्तीची एक महिन्याची नोटीस दिल्यानंतर, कोणत्याही वेळी, त्याच्या सेवा समाप्त करण्याचा प्राधिकार असेल. ]

सदस्यांची नेमणूक.

[२][३. (१) महा-समादेशकांच्या मंजुरीस अधीन राहून, समादेशकास राज्य शासन वेळोवेळी ठरवील असे काम करण्यास योग्य व इच्छुक असलेल्या व्यक्ती होमगार्डचे सदस्य म्हणून नेमता येतील आणि त्यास अशा कोणत्याही सदस्यास होमगार्डमधील कोणत्याही अधिकाराच्या जागेवर नेमता येईल.]

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही असले तरी, महा समादेशकास राज्य शासनाच्या मंजुरीस अधीन राहून, अशा कोणत्याही सदस्यास आपल्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही जागेवर नेमता येईल.]

१९५८ चा मुंबई ७५.
१९४७ चा मध्यप्रांत व वऱ्हाड १५.
१९४८ चा सौराष्ट्र आदेश १७.

[३][(३) मुंबई होमगार्ड (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९५८ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी, मध्यप्रांत व वऱ्हाड होमगार्ड अधिनियम, १९४७ अन्वये किंवा सौराष्ट्र राज्य होमगार्ड अध्यादेश, १९४८ अन्वये उभारलेल्या किंवा रचना केलेल्या होमगार्डमध्ये असलेली प्रत्येक व्यक्ती या कलमान्वये नेमलेली व्यक्ती आहे असे समजले जाईल आणि तिला दिलेले नेमणुकीचे प्रमाणपत्र व गणवेष त्याप्रमाणे कायदेशीर असतील].

सदस्यांची कामे व कर्तव्ये.

[४][४. (१) समादेशकास कोणत्याही वेळी, प्रशिक्षण घेण्यासाठी किंवा या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार होमगार्डना नेमून दिलेली कामे किंवा कर्तव्ये यांपैकी कोणतेही काम किंवा कर्तव्य बजावण्यासाठी होमगार्डला कोणत्याही वेळी बोलाविता येईल.

(२) महा समादेशकास, निकडीच्या वेळी, [५][महाराष्ट्र राज्यातील] कोणत्याही भागात शिक्षण घेण्यासाठी किंवा उक्त कामे किंवा कर्तव्ये यांपैकी कोणतेही काम किंवा कर्तव्ये बजावण्यासाठी होमगार्डला बोलवता येईल].

अधिकार संरक्षण व नियंत्रण.

५. (१) होमगार्डमधील सदस्यास कलम ४ अन्वये बोलाविण्यात येईल तेव्हा, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये नेमलेल्या पोलीस अधिकाऱ्याला जे अधिकार व विशेषाधिकार असतील व जे संरक्षण मिळत असेल तेच अधिकार व विशेषाधिकार त्याला असतील व तेच संरक्षण त्याला मिळेल.

---

१. सन १९७८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३१, कलम २ अन्वये, कलम २ अ समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम ३ अन्वये, मूळ कलमाऐवजी कलम ३ दाखल करण्यात आले.

३. सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७५, कलम ६ अन्वये, हे पोटकलम जादा दाखल करण्यात आले.

४. सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम ४ अन्वये, कलम ४ हे मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

५. महाराष्ट्र विधि अनुकूलन आदेश (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये ' मुंबई राज्यातील 'या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) होमगार्ड सदस्य या नात्याने आपली कामे [1][किंवा कर्तव्ये] बजावीत असताना अशा सदस्याने केलेल्या किंवा त्याने केल्याचे दिसून येणाऱ्या अशा कोणत्याही कृत्याच्या बाबतीत त्याच्याविरुद्ध कोणताही खटला, बृहन्मुंबईत पोलीस आयुक्ताची व इतरत्र जिल्हा दंडाधिकाऱ्याची पूर्वमंजुरी घेतल्यावाचून दाखल करण्यात येणार नाही.

पोलीस दलातील अधिकाऱ्यांनी नियंत्रण ठेवणे.

६. होमगार्डमधील सदस्यांना कलम ४ अन्वये पोलीस दलाच्या सहाय्यार्थ बोलाविण्यात येईल तेव्हा, ते कलम ८ अन्वये केलेल्या नियमांनी विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा मर्यादेपर्यंत पोलीस दलातील अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली राहतील.

सदस्य असण्याचे बंद झाल्यावर प्रमाणपत्र, शस्त्रे वगैरे स्वाधीन करणे

[2][६-क. (१) जी कोणतीही व्यक्ती कोणत्याही कारणामुळे होमगार्डमधील सदस्य असण्याचे बंद होईल ती आपल्या नेमणुकीचे किंवा पदाचे प्रमाणपत्र व होमगार्डचा असा सदस्य म्हणून तिला पुरविण्यात आलेली शस्त्रे, साजसरंजाम, कपडे व इतर आवश्यक वस्तू समादेशकाच्या किंवा समादेशक निदेश देईल अशा व्यक्तीच्या व अशा ठिकाणी ताबडतोब स्वाधीन करील.

(२) कोणत्याही दंडधिकाऱ्यास आणि त्या त्या वेळी लेखी नमूद करावयाच्या विशेष कारणांसाठी बृहन्मुंबई पोलीस उप–आयुक्त व इतरत्र सहाय्यक पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उप अधीक्षक यांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, अशा रितीने स्वाधीन न केलेले कोणतेही प्रमाणपत्र, शस्त्रे, साजसरंजाम, कपडे किंवा इतर आवश्यक वस्तू याकरिता झडती घेण्यासाठी व ती ज्या कोणत्याही ठिकाणी सापडतील त्या ठिकाणी त्यांचे अभिग्रहण अधिपत्र
१८९८ काढता येईल. अशा रीतीने काढलेले प्रत्येक अधिपत्र हे, फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ यांच्या
चा ५. तरतुदींस अनुसरून पोलीस अधिकाऱ्याने किंवा जर अधिपत्र काढणाऱ्याने, दंडाधिकाऱ्याने अथवा पोलीस अधिकाऱ्याने तसा निदेश दिलेला असेल इतर कोणत्याही व्यक्तीने बजावले पाहिजे.

(३) एखाद्या व्यक्तीला पुरविण्यात आलेली कोणतीही वस्तु, महा समादेशकाच्या आदेशानुसार त्याची मालमत्ता झालेली असेल तर त्या वस्तूस या कलमातील कोणतीही तरतूद लागू होते असे समजता कामा नये.

कर्तव्ये वगैरे बजावण्यात हयगय केल्याबद्दल सदस्यास शिक्षा.

६–ख. (१) समादेशकाच्या नियंत्रणाखाली असलेला होमगार्डमधील कोणताही सदस्य कलम ४ अन्वये त्यास बोलविण्यात आल्यावर, रास्त कारणाशिवाय, असा आदेश पाळण्यात किंवा होमगार्ड म्हणून असलेली आपली कामे करण्यात व कर्तव्ये बजावण्यात हयगय करील किंवा असा आदेश पाळण्याचे किंवा कामे करण्याचे व कर्तव्ये बजावण्याचे नाकारील अगर त्याची कामे व कर्तव्ये बजावण्यासाठी त्यास दिलेला कोणताही कायदेविषयक आदेश किंवा निदेश पाळण्यात हयगय करील किंवा पाळण्याचे नाकारील किंवा कोणताही शिस्तभंग केल्याबद्दल किंवा गैरवर्तणूक केल्याबद्दल दोषी असेल तर, समादेशकास त्याला निलंबित करण्याचा, त्यास पदावनत करण्याचा किंवा त्याला जास्तीत जास्त पन्नास रूपये इतका दंड करण्याचा प्राधिकार असेल. [3][ज्या वर्तणुकीमुळे होमगार्डच्या सदस्यावर फौजदारी आरोप ठेवण्यात येऊन त्याला सिद्धापराध ठरविण्यात आले असेल त्या वर्तणुकीबद्दल अशा सदस्यास बडतर्फ करण्याचाही समादेशकास प्राधिकार असेल ]. महा समादेशकास त्याच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली असलेल्या पदावर नेमण्यात आलेल्या कोणत्याही होमगार्डच्या बाबतीत तसाच प्राधिकार असेल.

---

[1] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम ५ अन्वये, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ६ अन्वये कलमे ६-अ व ६-ब समाविष्ट करण्यात आली.

[3] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम २ (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][(१–क) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, समादेशकाच्या मते कोणत्याही होमगार्ड सदस्यांच्या सेवेची यापुढे आवश्यकता राहिली नसेल तर, विहित करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, अशा सदस्याला कोणत्याही वेळी सेवामुक्त करण्याचा प्राधिकार समादेशकाला असेल. महा-समादेशकाला त्याच्या निकट नियंत्रणाखाली असलेल्या पदावर नेमण्यात आलेल्या कोणत्याही होमगार्डच्या बाबतीत तसाच प्राधिकार असेल. ]

(२) महा-समादेशकाने किंवा समादेशकाने पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही होमगार्डला निलंबित करण्याविषयी, त्याला पदावनत करण्याविषयी, बडतर्फ करण्याविषयी किंवा दंड करण्याविषयी आदेश दिल्यास, त्याने असा आदेश, त्याची कारणे व त्याने केलेल्या चौकशीचे टिपण लेखी नमूद केले पाहिजे किंवा नमूद करण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि संबंधित व्यक्तीस आपली बाजू मांडून बचाव करण्याची संधी दिल्यावाचून महा समादेशकास किंवा समादेशकास असा कोणताही आदेश देता येणार नाही.

(३) समादेशकाच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही होमगार्ड सदस्याला महा-समादेशकाकडे तसेच महा-समादेशकाच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या अशा कोणत्याही होमगार्ड सदस्याला राज्य शासनाकडे अशा आदेशाची नोटीस त्याच्यावर बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत अशा आदेशाविरूद्ध अपील करता येईल. यथास्थिति महा-समादेशकाला किंवा राज्य शासनाला त्यास योग्य वाटेल असा आदेश त्यावर देता येईल.

(४) महा-समादेशकाला किंवा राज्य शासनाला अनुक्रमे समादेशकाने किंवा महा-समादेशकाने पोट-कलम (१) [२][किंवा (१–क) ] अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचा कायदेशीरपणा किंवा औचित्य याविषयी आपली खात्री करून घेण्यासाठी यथास्थिति, समादेशकाने किंवा महा-समादेशकाने दिलेल्या अशा आदेशासंबंधीचा अभिलेख कोणत्याही वेळी मागविता येतील व त्याची तपासणी करता येईल, तसेच त्यास योग्य वाटेल असा त्यासंबंधी आदेश देता येईल.

(५) यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे, ज्यावर अपील करण्यात येणार नाही असा प्रत्येक आदेश आणि या कलमान्वये अपिलात किंवा पुनरीक्षणात दिलेला प्रत्येक आदेश अंतिम असेल.

(६) या कलमान्वये केलेला कोणताही दंड, तो जणू न्यायालयाने केलेला दंड आहे असे समजून न्यायालयाने केलेला दंड वसूल करण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ *मध्ये जी रीत
१८९८ चा ५ निर्दिष्ट केली असेल त्या रीतीने वसूल करता येईल.

(७) या कलमाअन्वये होमगार्ड सदस्यास जी कोणतीही शिक्षा देण्यात आली असेल ती शिक्षा कलम ७ अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये जी शास्ती दिली जाण्यास तो पात्र असेल त्या शास्तीच्या जोडीने असेल.]

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम २ (दोन) अन्वये पोट-कलम (१-अ) समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ (तीन) अन्वये हा मजकूर, कंस, आकडे व अक्षरे समाविष्ट करण्यात आली.

* फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) पहा.

७. (१) जर कोणताही होमगार्ड सदस्य, कलम ४ अन्वये त्यास बोलविण्यात आल्यावर [१][रास्त सबबीवाचून], असा आदेश पाळण्यात किंवा होमगार्ड सदस्य म्हणून असलेली त्याची कामे करण्यास हयगय करील किंवा असा आदेश पाळण्याचे किंवा अशी कामे करण्याचे नाकारील अगर त्याची कर्तव्ये त्याने बजावण्यासाठी त्याला दिलेला कोणताही कायदेविषयक आदेश किंवा निदेश पाळण्यात हयगय करील किंवा पाळण्याचे नाकारील तर, त्याला सिद्धापराध ठरविण्यात आले असता, तीन महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल किंवा अडीचशे रूपयेपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाच्या शिक्षेस पात्र होईल किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल. शास्ती.

[२][(१–क) जर कोणताही होमगार्ड सदस्य, कलम ६–क, पोट-कलम (१) च्या तरतुदींनुसार आपल्या नेमणुकीचे किंवा पदाचे प्रमाणपत्र किंवा इतर कोणतीही वस्तू स्वाधीन करण्यात हेतूपुरस्सर हयगय करील किंवा स्वाधीन करण्याचे नाकारील तर, त्यास, सिध्दापराध ठरविण्यात आले असता एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा शंभर रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.]

(२) समादेशकांच्या पूर्वमंजुरीवाचून पोट-कलम (१) [३][किंवा (१–क)] अन्वये कोणतीही कार्यवाही दाखल करता येणार नाही.

(३) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) [४][किंवा (१–क)] अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध करील तिला पोलीस अधिकारी अधिपत्रावाचून अटक करू शकेल.

८. [५][राज्य] शासनास, पुढील गोष्टींबाबत या अधिनियमाशी सुसंगत असे नियम करता येतील:— नियम.

[६][ (क) कलम ४ द्वारे समादेशकाला किंवा महा समादेशकाला दिलेले अधिकार होमगार्डच्या कोणत्याही अधिकाऱ्याला वापरता येतील अशी तरतूद करणे;]

(ख) पोलीस दलाच्या सहाय्यार्थ काम करीत असताना, होमगार्डवर पोलीस दलातील अधिकाऱ्यांनी नियंत्रण ठेवण्याची तरतूद करणे;

[७][ (ख-क) समादेशक व महा-समादेशक यांचा पदावधी व सेवेच्या इतर शर्ती यांचे विनियमन करणे.]

(ग) होमगार्डची संघटना, नेमणुका, सेवेच्या शर्ती, कामे, शिस्त, शस्त्रे, साजसरंजाम व कपडे यांचे व ज्या रीतीने त्यांना कामावर बोलाविता येईल त्या रीतीचे विनियमन करणे;

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम ७ (१) अन्वये ' पुरेशा सबबीवाचून ' या मजकुराऐवजी हा मजकूर, दाखल करण्यात आला.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम ७ (२) अन्वये पोट-कलम (१-क) हे समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७ (३) अन्वये हा मजकूर, कंस, आकडे व अक्षरे समाविष्ट करण्यात आली.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७ (४) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम ८ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[७] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३१, कलम ३ अन्वये कलम (ख-क) समाविष्ट करण्यात आले.

(ध) या अधिनियमाच्या कलम ५ अन्वये वापरण्याजोगे कोणतेही अधिकार होमगार्डनी वापरण्यासंबंधात विनियमन करणे;

(ड) सर्वसाधारणपणे या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणणे.

होमगार्डचे सदस्य लोकसेवक असणे.

९. या अधिनियमाअन्वये काम करणारे होमगार्ड सदस्य हे, भारतीय दंड संहिता, कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत, असे समजले जाईल. १८६० चा ४५.

होमगार्डचे राज्य विधानमंडळाच्या किंवा स्थानिक संस्थांच्या निवडणुका लढविण्यास निरर्ह नसणे.

[१][९–क.] (१) होमगार्ड सदस्य हा, तो होमगार्ड सदस्य आहे याच केवळ वस्तुस्थितीमुळे, [२][महाराष्ट्र विधानसभेचा] किंवा [२][महाराष्ट्र विधानपरिषदेचा] सदस्य म्हणून निवडला जाण्यास व असण्यास निरर्ह असणार नाही.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात तद्विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, होमगार्ड सदस्य हा, तो होमगार्ड सदस्य आहे याच केवळ वस्तुस्थितीमुळे कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा सदस्य म्हणून निवडला जाण्यास व असण्यास निरर्ह असणार नाही.]

निरसन व व्यावृत्ती.

१०. मुंबई होमगार्ड अध्यादेश, १९४६, हा याअन्वये निरसित करण्यात आला आहे :

परंतु, उक्त अध्यादेशाअन्वये रचना करण्यात आलेली होमगार्ड संघटना ही, या अधिनियमाअन्वये रचना करण्यात आलेली होमगार्ड संघटना आहे असे समजले जाईल; आणि उक्त अध्यादेशाअन्वये केलेल्या व हा अधिनियम अंमलात येण्याच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या सर्व नेमणुका व नियम अंमलात असण्याचे चालू राहील आणि ते या अधिनियमास अनुलक्षून करण्यात आले आहेत असे समजले जाईल. सन १९४६ चा मुंब[ई] अध्यादे[श] १.

---

[१] सन १९७८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३१, याच्या कलम ९ अन्वये कलम ९-क समाविष्ट करण्यात आले.

[२] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबई विधानसभेचा "व "मुंबई विधानपरिषदेचा " या शब्दांऐवजी अनुक्रमे हे शब्द दाखल करण्यात आले.

# Maharashtra Government Publications can be obtained from—

- THE DIRECTOR
  Government Printing, Stationery and Publications
  Maharashtra State
  Netaji Subhash Road, MUMBAI 400 004.
  Phone : 2363 26 93    2363 06 95
  2363 11 48    2363 40 49

- THE MANAGER
  Government Photozinco Press and Book Depot
  Photozinco Press Area, Near G.P.O.
  PUNE 411 001.
  Phone : 261 25 808    261 28 920

- THE MANAGER
  Government Press and Book Depot
  Civil Lines
  NAGPUR 440 001.
  Phone : 252 26 15

- THE ASSTT. DIRECTOR
  Government Stationery, Store and Book Depot
  Shaha Ganj, Near Gandhi Chowk
  AURANGABAD 431 001.
  Phone : 233 14 68

- THE MANAGER
  Government Press and Stationery, Store
  Tarabai Park,
  KOLHAPUR 416 003.
  Phone : 265 03 95,    265 04 02

**AND THE RECOGNISED BOOKSELLERS**